भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ – २७: साप्ताहिक चौदावा पीक सल्ला
## (कालावधी १० सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२६)

### अ. मातीचे आरोग्य, अन्नद्रव्ये, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण शिफारसी

कापसाचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी मातीतील अन्नद्रव्यांचा संतुलित पुरवठा, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षणावर आधारित प्रतिबंधात्मक व प्रभावी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब केल्यास पिकाची योग्य वाढ व जोम टिकून राहतो, निविष्ठांचा खर्च कमी होतो आणि किडी व रोगांमुळे होणारे मोठे नुकसान टाळता येते.

### मातीचे आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (INM)

- **मुख्य अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन:** पीक फेरपालट, सेंद्रिय द्रव्यांचा वापर आणि आच्छादित पिकांचा अवलंब करून मातीचे आरोग्य सुधारावे. पेरणीपूर्वी माती परीक्षण करून त्याच्या आधारे रासायनिक खतांचा संतुलित व गरजेनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर**: जस्त (Zinc), बोरॉन (Boron), मँगनीज (Manganese) आणि मॅग्नेशियम (Magnesium) यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता पिकामध्ये आढळल्यास आवश्यकतेनुसार योग्य सूक्ष्म अन्नद्रव्यांची लक्षित पर्णीय फवारणी करून कमतरता दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (IDM)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात:** मातीजन्य तसेच पर्णीय रोगकारकांचे व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये योग्य शेत स्वच्छता, तसेच पिकाची निरोगी वाढ व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी बियाणे व जमिनीत जैविक कीडनाशके (बायोपेस्टीसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा प्रक्रिया म्हणून वापर करावा.
- **पानांवरील रोगांचा प्रादुर्भाव नियंत्रित करावा:** जास्त आर्द्रतेच्या कालावधीत शेताचे नियमित निरीक्षण करावे. रोगाचा जलद विकास व प्रसार होण्यासाठी अनुकूल वातावरणीय परिस्थिती निर्माण झाल्यासच शिफारशीत बुरशीनाशकांची योग्य प्रमाणात व गरजेनुसार फवारणी करावी.

### एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM)

- **शेताचे नियमित निरीक्षण करावे:** रसशोषक किडी जसे फुलकिडे, मावा, तुडतुडे आणि कोळी तसेच बोंडअळ्यांचा प्रादुर्भाव तपासण्यासाठी दर आठवड्याला शेताचे नियमित सर्वेक्षण व निरीक्षण करावे.
- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करावा:** हंगामाच्या सुरुवातीपासून कामगंध सापळे लावून प्रौढ पतंगांची हालचाल व संख्या यांचे निरीक्षण करावे. त्याद्वारे अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेऊन प्रादुर्भावाच्या सुरुवातीच्या अवस्थेत सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा प्राथमिक उपाय म्हणून वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रूंचे संवर्धन करावे:** ढालकिडे, लेसविंग्ज आणि बिग-आयड बग्स यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संरक्षण करावे. यासाठी सर्वसाधारणपणे अनेक किडींवर परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक व मित्रकिडींवर कमीतकमी परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांना प्राधान्य द्यावे.

- **रासायनिक कीटकनाशकांचा वापर मर्यादित ठेवावा:** लेबलवर शिफारस केलेल्या रासायनिक कीटकनाशकांचा वापर अंतिम उपाय म्हणूनच करावा. किडींची संख्या निर्धारित आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतरच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी.

## ब. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सप्टेंबर | | | | | | | सप्टेंबर | | | | |
| | | 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 | 07 | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| | धुळे | | | | | | | | 4 | 0.5 | 0.2 | 7 | 32.9 |
| | नंदुरबार | | | | | | | | 3.6 | 0.5 | 0.3 | 2.8 | 28.7 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4.7 | 0.7 | 0.3 | 10.7 | 28.6 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 | 2.1 | 0.8 | 0.1 | 3.5 | 28 |
| | औरंगाबाद | 0.2 | 0.2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3.2 | 0.6 | 0.2 | 7.9 | 37.4 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2.6 | 0.6 | 0.2 | 9.1 | 35.3 |
|  | बीड | | | | | | | | 1.2 | 0.4 | 0.2 | 8.1 | 29.6 |
| | नांदेड | | | | | | | | 0.8 | 0.8 | 1.9 | 18.3 | 20.7 |
| | परभणी | 0 | 0.3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.6 | 0.6 | 0.3 | 11.4 | 25.8 |
| | हिंगोली | | | | | | | | 1 | 0.7 | 0.5 | 12 | 22.1 |
| | बुलढाणा | 2 | 0 | 3 | 0 | 9 | 0 | 0 | 3.2 | 0.7 | 0.1 | 9 | 25.8 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0.8 | 0.7 | 0 | 2.2 | 0.5 | 0.3 | 14 | 20.7 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4.2 | 0.8 | 0.6 | 16.5 | 18.3 |
| | अमरावती | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0.4 | 0 | 3.8 | 0.6 | 1.7 | 10.6 | 12.6 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1.5 | 0.7 | 3.3 | 23.2 | 18.6 |
| | वर्धा | 0 | 1 | 7 | 2.2 | 0 | 0 | 0 | 2.8 | 1 | 5.6 | 15.7 | 12.2 |
| | नागपूर | 0.2 | 0 | 7 | 2.4 | 4 | 0 | 0 | 3.8 | 1.2 | 6.4 | 14.7 | 15 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 20 | 8 | 0 | 1 | 0 | 1.8 | 1.5 | 10 | 19.6 | 17.4 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | 64.5 to 115.5 मिमी | | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | मुसळधार पाऊस | | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक परिस्थिती:**

अकोला येथे पेरणी केलेले कापूस पीक ७१ ते ७६ दिवसांचे असून सध्या फुले येणे व बोंडधारणा अवस्थेत आहे. शेतामध्ये कोळपणी व निंदणीची कामे करण्यात आली आहेत. तसेच किडी, रोग व सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकतेनुसार कीटकनाशके, बुरशीनाशके व सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करण्यात आली. अहवालाच्या आठवड्यात दीर्घकाळ पावसाचा खंड व कोरडे वातावरण राहिल्यामुळे काही भागात फ्युजेरियम मर रोग व मॅक्रोफोमिना मूळकूज रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून आला. जमिनीत ओलावा कमी झाल्यामुळे पिकाची वाढ खुंटलेली दिसून आली. काही शेतांमध्ये पांढरी माशी व फुलकिडे या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून आला.

राहुरी येथे पेरणीच्या वेळेनुसार सिंचनाखालील कापूस पीक ६४ ते ९९ दिवसांचे असून सध्या फुले येणे, बोंडधारणा व बोंडविकास अवस्थेत आहे. पिकाला पाणी देणे, कोळपणी, निंदणी, फवारणी तसेच खतांचा वापर करण्यात आला आहे. शेतामध्ये तणांचा

प्रादुर्भाव दिसून आला. अनेक शेतांमध्ये फुलकिडे व तुडतुडे यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त आढळून आला, तर मावा किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी होता. काही फुलांमध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळून आला. मायलोसेरस भुंग्यामुळे सुमारे १ टक्के कापूस झाडांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतांमध्ये तंबाखू स्ट्रीक विषाणू रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला.

नांदेड येथे पेरणी केलेले कापूस पीक ६० ते ८५ दिवसांचे असून सध्या पाते लागण्यापासून बोंडधारणा अवस्थेत आहे. अहवालाच्या कालावधीत आंतरमशागत, निंदणी, खतांचा वापर, पीक संरक्षणाच्या उपाययोजना तसेच वाढ नियंत्रकाची फवारणी करण्यात आली. शेतामध्ये गवतवर्गीय, रुंद पानांची तणे तसेच लव्हाळा वर्गातील तणांचा प्रादुर्भाव दिसून आला. काही शेतांमध्ये तुडतुडे व मावा आढळून आला; मात्र त्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी होता. या कालावधीत कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला नाही.

**पीकसल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ४५-५० दिवसांनी जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी कापूस शेतात सऱ्या पाडाव्यात. कापसामध्ये कोळपणी व निंदणीसारखी आंतरमशागतीची कामे करावीत. जमिनीत ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मि.ली./लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मि.ली./लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांची दोन्ही तणे असल्यास पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २-२.५ मि.ली./लिटर पाणी फवारावे. सिंचनाखालील संकरित कापसासाठी रासायनिक खताचा पहिला हप्ता म्हणून ४० किलो नत्र (९० किलो युरिया/हेक्टर) आणि कोरडवाहू संकरित/देशी कापसासाठी ४५ किलो नत्र (९७ किलो युरिया/हेक्टर) वरखत म्हणून द्यावे. मावा, तुडतुडे व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क + ५ मि.ली. निंबोळी तेल/लिटर पाणी किंवा निंबोळी तेलावर आधारित ३०० किंवा १५०० पीपीएम घटकांची ५ मि.ली./लिटर पाणी + १ ग्रॅम कपडे धुण्याचा डिटर्जंट यांचे मिश्रण करून फवारावे. तसेच गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति एकर २ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) लावावेत आणि किडींच्या प्रादुर्भावाची पाहणी करण्यासाठी प्रत्येक एकरातील प्रतिनिधी म्हणून २० झाडांचे नियमित निरीक्षण करावे. पॅराविल्ट ची लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डबल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी. फ्युजेरियम मर व मॅक्रोफोमिना मूळकूज रोगग्रस्त भागात बाधित झाडे मुळासकट उपटून त्वरित नष्ट करावीत, जेणेकरून रोगाचा प्रसार होणार नाही. रोगग्रस्त झाडांच्या आजूबाजूच्या झाडांना कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १.२ ग्रॅम/लिटर पाणी याची आळवणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोडर्मा हार्झियानम किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी @ ५ ग्रॅम/लिटर पाणी याची दोन वेळा आळवणी करावी. उच्च घनता लागवड पद्धतीत (९० × १५ सें.मी.) किंवा जवळच्या अंतरावर (९० × ३० सें.मी.) लागवड केलेल्या कापसामध्ये, पिकाच्या ४०-४५ दिवसांच्या अवस्थेत किंवा पाते लागण्याच्या वेळी मेपिक्वाट क्लोराईड ५% एएस @ १ मि.ली./लिटर पाणी या वाढ नियंत्रकाची फवारणी करावी व त्यानंतर १५-२० दिवसांनी १ मि.ली./लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. मात्र, दीर्घकाळ पावसाचा खंड पडून पिकाला ओलाव्याचा ताण असल्यास मेपिक्वाट क्लोराईडची फवारणी करू नये. अशा परिस्थितीत पर्याय म्हणून १३:००:४५ @ २ किलो प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून पर्णीय फवारणी करावी. कापसामध्ये पाते गळ होत असल्यास पाते व फुले नैसर्गिकरीत्या गळून पडणे कमी करण्यासाठी एनएए @ ४ मि.ली./१० लिटर पाणी या प्रमाणात पर्णीय फवारणी करावी.

राहुरी येथे शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ६० दिवसांनी खताचा दुसरा हप्ता द्यावा. कापूस पीक तणमुक्त ठेवण्यासाठी हाताने कोळपणी व निंदणी करावी किंवा ट्रॅक्टर अथवा बैलचलित अवजारांच्या साहाय्याने आंतरमशागत करावी. तणनाशकासाठी पुरेशी जमिनीतील ओलावा असल्यास, हाताने निंदणी शक्य नसलेल्या परिस्थितीत गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मि.ली./लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मि.ली./लिटर पाणी किंवा दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @

२-२.५ मि.ली./लिटर पाणी फवारावे. पारथेनियम (काँग्रेस गवत) शेतातून तसेच बांधावरून उपटून नष्ट करावे, त्यामुळे टीएसव्ही रोग व फुलकिड्यांचा प्रादुर्भाव टाळण्यास किंवा कमी करण्यास मदत होईल. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावावर नियमित लक्ष ठेवावे. पिवळे चिकट सापळे लावावेत आणि ५% निंबोळी अर्क किंवा अझाडिरॅक्टिन १०,००० पीपीएम @ १० मि.ली./१० लिटर पाणी यांची फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास फ्लोनिकामिड ५० डबल्यूजी @ २ ग्रॅम/१० लिटर पाणी किंवा बुप्रोफेझिन २५ एससी @ २० मि.ली./१० लिटर पाणी फवारावे. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे लावावेत. गुलाबी बोंडअळीची पुढील पिढी होऊ नये म्हणून डोमकळी (रोझेट फुले) अळीसह नियमितपणे गोळा करून नष्ट करावीत. उच्च घनता लागवड पद्धतीत (९० × १५ सें.मी.) किंवा जवळच्या अंतरावर (९० × ३० सें.मी.) लागवड केलेल्या कापसामध्ये पिकाच्या ४०-४५ दिवसांनी किंवा पाते लागण्याच्या वेळी मेपिक्वाट क्लोराईड ५% एएस @ १ मि.ली./लिटर पाणी फवारावे आणि त्यानंतर १५-२० दिवसांनी पुन्हा १ मि.ली./लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र, दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्यामुळे पिकाला ओलाव्याचा ताण असल्यास मेपिक्वाट क्लोराईडची फवारणी करू नये. त्याऐवजी १३:००:४५ @ २ किलो प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून पर्णीय फवारणी करावी. कापसामध्ये पाते गळ होत असल्यास पाते व फुले नैसर्गिकरीत्या गळून पडणे कमी करण्यासाठी एनएए @ ४ मि.ली./१० लिटर पाणी याची पर्णीय फवारणी करावी. ९० × ३० सें.मी. अंतरावर लागवड केलेल्या कापसात वाढ नियंत्रकाची फवारणी करायची नसल्यास, पेरणीनंतर ४५ दिवसांनी मोनोपोडिया फांद्या काढाव्यात आणि ७५-८० दिवसांनी शेंड्याकडील वाढ खुडावी (डिटॉपिंग करावे). पॅराविल्ट दिसून आल्यास लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डबल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी. तंबाखू स्ट्रीक व्हायरस रोगाचा प्रसार होऊ नये यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे. फुलकीडींच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर २० निळे चिकट सापळे आणि नियंत्रणासाठी प्रति हेक्टर १०० निळे चिकट सापळे लावावेत. टीएसव्ही रोगाची लागण झालेली झाडे मुळासकट उपटून नष्ट करावीत. रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शेत व शेताच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा, विशेषतः कापूस शेतातील व बांधावरील पारथेनियम (काँग्रेस गवत) नियमितपणे काढून टाकावे आणि फुलकीडींच्या नियंत्रणासाठी शिफारस केलेल्या उपाययोजना कराव्यात. फुलकीडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी पेक्षा जास्त असल्यास शिफारस केलेल्या कीटकनाशकांचा वापर करून नियंत्रण करावे.

नांदेड येथे शेतकऱ्यांनी तणांचे नियंत्रण करण्यासाठी आंतरमशागत व निंदणीची कामे करावीत. पिकाला पाण्याची कमतरता जाणवत असल्यास उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे. जमिनीत पुरेसा ओलावा असताना हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथाइल ५% ईसी @ २ मि.ली./लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मि.ली./लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही तणांच्या नियंत्रणासाठी पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाइल ४% एमईसी @ २-२.५ मि.ली./लिटर पाणी फवारावे. सिंचनाखालील कापसाला पेरणीनंतर ६० दिवसांनी ६० किलो नत्र/हेक्टर आणि कोरडवाहू कापसाला पेरणीनंतर ३० दिवसांनी ४८ किलो नत्र/हेक्टर आळवणी पद्धतीने किंवा खताची रांग करून द्यावे. युरिया जमिनीवर पसरून देऊ नये. उच्च घनता लागवड पद्धतीत किंवा जवळच्या अंतरावर लागवड केलेल्या बीटी कापसामध्ये पाते लागण्याच्या अवस्थेत मेपिक्वाट क्लोराईड ५% @ ५०० मि.ली./हेक्टर या वाढ नियंत्रकाची फवारणी करावी. पेरणीनंतर ३० दिवसांनी रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क याची पर्णीय फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त झाल्यास बुप्रोफेझिन २० एससी @ १००० मि.ली./हेक्टर किंवा डायनोटेफ्युरॉन २० एसजी @ १५० ग्रॅम/हेक्टर यापैकी योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी. शेत व शेताचे बांध तणमुक्त ठेवावेत तसेच फुलकीडींची संख्या वाढू नये आणि टीएसव्ही रोगाचा प्रादुर्भाव कमी व्हावा यासाठी शेतातील व शेताच्या आजूबाजूचा पारथेनियम (काँग्रेस गवत) काढून टाकावे. पॅराविल्ट दिसून आल्यास लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डबल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्यूपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी. पानावरील ठिपके व बोंडसड नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्यूपी @ ३० ग्रॅम, किंवा प्रोपिकोनाझोल २५% ईसी @ १० मि.ली., किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२% डबल्यू/डबल्यू + डायफेनोकोनाझोल

११.४% डबल्यू/डबल्यू एससी @ १० मि.ली., किंवा फ्लक्सापायरॉक्साड १६७ ग्रॅम/लिटर + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/लिटर एससी @ ६ मि.ली. प्रति १० लिटर पाणी यापैकी शिफारशीनुसार फवारणी करावी. उच्च घनता लागवड पद्धतीत (९० × १५ सें.मी.) किंवा जवळच्या अंतरावर (९० × ३० सें.मी.) लागवड केलेल्या कापसामध्ये पिकाच्या ४०-४५ दिवसांनी किंवा पाते लागण्याच्या वेळी मेपिक्वाट क्लोराईड ५% एएस @ १ मि.ली./लिटर पाणी फवारावे व त्यानंतर १५-२० दिवसांनी पुन्हा १ मि.ली./लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. मात्र, दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्यामुळे पिकाला ओलाव्याचा ताण असल्यास मेपिक्वाट क्लोराईडची फवारणी करू नये. त्याऐवजी १३:००:४५ @ २ किलो प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून पर्णीय फवारणी करावी. कापसामध्ये पाते गळ होत असल्यास पाते व फुले नैसर्गिकरीत्या गळून पडणे कमी करण्यासाठी एनएए @ ४ मि.ली./१० लिटर पाणी याची पर्णीय फवारणी करावी.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google Play Store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisories are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**
Dr. G. T. Behere, Dr. A. S. Tayade, Dr. A. H. Prakash, Dr. S.K. Verma
Dr. S.K. Sain, Dr. Rishi Kumar, Dr. Babasaheb B. Fand, Dr. Ramkrushna GI
Dr. S.P Gawande, Dr. Shivaj Thube, Dr. R.R. Chapke

**Regional language translation**:
**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra
**Punjabi** : Dr Amarpreet Singh
**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan
**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary
**Marathi** : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge
**Gujrati** : Dr H R. Desai & Dr Vivek Shah
**Oriya** : Dr B. S. Nayak
**Kannada** : Dr Neelkanth Hiremani